# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
# बृहन्मुंबई खंडपीठ

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

## अपील क्र. MHSICMU/२०२२/M/०००३८१

**अपिलार्थी श्री. भास्कर रविभाई त्रिवेदी**
**विरुद्ध**
**जन माहिती अधिकारी तथा उप निबंधक**
Teaching Appointment & Approval Section
मुंबई विद्यापीठ, फोर्ट परिसर, एम.जी.रोड, मुंबई -४०० ०३२.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा निबंधक**
प्रथम अपिलीय अधिकारी यांचे कार्यालय, रुम नं.१०८,
मुंबई विद्यापीठ, फोर्ट परिसर, एम.जी.रोड, मुंबई -४०० ०३२.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २३.०४.२०२४**

अपीलकर्ता : उपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| ०४.०८.२०२१ | ३०.०८.२०२१ | २३.०९.२०२१ | १०.१२.२०२१ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. ०३.०१.२०२२ रोजीच्या अर्जान्वये द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. ३०.०८.२०२१ व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश दि. १०.१२.२०२१ संलग्न केले आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांचा माहिती अर्ज दि. ०४.०८.२०२१ अन्वये प्रा. गौतम गोविल व प्रा. डॉ. मधु नायर यांच्या संबंधीची दोन मुद्दयांमध्ये माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे पत्र दि. ३०.०८.२०२१ अन्वये अपिलार्थी यांना प्रा. गौतम गोविल यांचा सेवानिवृत्तीचा दिनांक कळविला आहे. व मुद्दा क्रमांक दोनचे बाबत माहिती संबंधित कॉलेजशी संबंधित असल्याचे नमूद केले आहे.

अपिलार्थी यांनी दि. २३.०९.२०२१ रोजी दाखल केलेल्या प्रथम अपील अर्जावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. १०.१२.२०२१ रोजी प्रा. मधु नायर यांच्या सेवानिवृत्तीचा दिनांक अपिलार्थी यांना कळविण्यात यावा व व दुसऱ्या मुद्दयाबाबत स्पष्ट माहिती देण्यात यावी, असे आदेश पारीत केले आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अधिकारी उपस्थित आहेत.

..२/-

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असे नमुद केले की, त्यांना मुद्दा क्रमांक १ ची पूर्ण माहिती मिळाली नाही. दुसऱ्या मुद्दाची माहिती मिळाली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असे नमूद केले की, माहिती इतर कॉलेजशी संबंधीत होती. त्यामुळे त्यासाठी त्यांचा अर्ज संबंधीत कॉलेजला हस्तांतरीत करणे आवश्यक होते.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, दिनांक १०.१२.२०२१ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना प्रा.डॉ. मधु नायर यांची सेवानिवृत्तीची तारीखेबद्दलची माहिती देण्याचे आदेश दिले होते. अपिलार्थी उपस्थित असून त्यांचे म्हणणे आहे की, त्यांना डॉ. मधु नायर यांचे सेवानिवृत्तीच्या तारखे व्यतिरिक्त सर्व माहिती प्राप्त झाली आहे. फक्त त्यांना डॉ. मधु नायर यांच्या सेवानिवृत्तीच्या तारखेची माहिती हवी आहे. जन माहिती अधिकारी तथा उपकुलसचिव यांनी सदर माहिती सात दिवसांच्या आत संबंधित कॉलेजकडून प्राप्त करुन अपिलार्थींना देण्याचे कबूल केले. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

## आदेश

**१. जन माहिती अधिकारी तथा उपकुलसचिव यांनी डॉ. मधु नायर यांच्या सेवानिवृत्तीच्या तारखेबाबतची माहिती सात दिवसांच्या आत संबंधित कॉलेजकडून प्राप्त करुन अपिलार्थींना विनाशुल्क उपलब्ध करुन द्यावी.**

**२. अपील निकाली काढण्यात येत आहे.**

प्रदीप व्यास
23-4-2024

State Information Commission
Greater Mumbai
सत्यमेव जयते

**मुंबई**
**दिनांक : २३.०४.२०२४**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**